## नियमित दावा क्रमांक ५४९/२०१५, निशाणी क्रमांक ५ खालील आदेश

१. दावा मिळकतींमध्ये असणा-या वादींच्या शांततामय कब्जास, पिके घेण्यास, मेहनत मशागतीस व वहिवाटीस प्रतिवादींनी स्वतः अगर इतरांमार्फत हिल्ला हरकती करु नयेत अशा आशयाचा तुर्तातुर्त मनाई हुकूम प्रतिवादीं विरुध्द मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज वादीने सादर केलेला आहे.

२. जिल्हा अहमदनगर, पैकी मौजे राहाता नगरपालिका हद्दीतील स.नं. २३२/९ पैकी ० हे. ६९ आर तसेच स.नं. २३२/९ पैकी ० हे ११ आर या शेतजमीन मिळकती प्रस्तुत दाव्याचा वाद विषय आहेत. या पुढे सुलभतेसाठी सदर मिळकतींना अनुक्रमे ''दावा मिळकत १अ'' व ''दावा मिळकत १ ब'' असे संबोधण्यात येते.

३. वादींचे प्रस्तुत अर्जातील थोडक्यात कथन असे की, दावा मिळकती या वादींच्या खरेदी मालकी हक्काच्या आहेत. वादी क्रमांक २ मयत असून वादी क्रमांक २अ,२ब व २क हे त्यांचे कायदेशीर वारस आहेत. सदर मिळकतींपैकी दावा मिळकत १अ ही वादींनी दिनांक १४/०१/२०१० रोजी नोंदणीकृत दस्त क्रमांक १६८/२०१० अन्वये खरेदी केलेली असून दावा मिळकत १ब ही वादींनी दिनांक ०२/०५/२०११ रोजी नोंदणीकृत दस्त क्रमांक २२८७/२०११ अन्वये खरेदी केलेली आहे. तेव्हापासून वादींचा दावा मिळकतींवरील कब्जा कायम आहे. दावा मिळकती या वादींचे पुर्वहक्कदार नानासाहेब रामराव कापसे व भागीरथीबाई नानासाहेब कापसे यांच्या खरेदी मालकीच्या होत्या. दावा मिळकत १अ ही सन १९९४ मध्ये नोंदणीकृत दस्त क्रमांक १५४६/१९९४ अन्वये खरेदी केलेली आहे. तर भागीरथीबाई रामराव कापसे यांनी यांनी दावा मिळकत १ब ही नोंदणीकृत दस्तान्वये दिनांक १४/१०/१९९८ रोजी खरेदी केलेली आहे. तेव्हांपासून खरेदीखताने मालकी हक्काने त्यांची दावा मिळकतीमध्ये कब्जे वहिवाट चालू होती.

४. त्यानंतर नानासाहेब कापसे यांनी दावा मिळकत १अ ही दिनांक १०/१०/२००५ रोजी भागवत गंगाधर सदाफळ यांना नोंदणीकृत दस्ताने गहाण दिली होती. मात्र त्यानंतर वादींचे बरोबर सदर मिळकत विक्री व्यवहाराची बोलणी करुन ते क्षेत्र गहाणमुक्त केले व दिनांक १४/०१/२०१० रोजी वादींचे लाभात त्या मिळकतीचे खरेदीखत लिहून व नोंदवून दिले. तेव्हापासून दावा मिळकत १अ मध्ये वादींची खरेदीखताने मालकी

हक्काने कब्जे वहिवाट आहे. अशाप्रकारे दावा मिळकत १अ मध्ये सन १९९४ ते २००५ पावेतो नानासाहेब कापसे यांची कब्जे वहिवाट, सन २००५ ते जानेवारी २०१० पावेतो गहाणदार भागवत सदाफळ यांची कब्जे वहिवाट व तद्नंतर दिनांक १४/०१/२०१० पासून वादींची कब्जे वहिवाट आहे.

५. दावा मिळकत १ब ही दावा मिळकत १अ च्या लगतच असल्याने सदर मिळकत भागीरथीबाई नानासाहेब कापसे यांचेकडून वादी क्रमांक १ चे भाऊ मुन्वर शेख यांनी दिनांक ०२/०५/२०११ रोजी खरेदी केलेली आहे. अशाप्रकारे दावा मिळकत १अ व १ब यामध्ये वादींची खरेदीखतापासून मालकी, कब्जे वहिवाट कायम आहे. वादींनी दावा मिळकतीत २० x ६० फुटांचे पत्र्याचे शेड सामान ठेवण्यासाठी बांधलेले आहे. परंतु दरम्यानचे काळात प्रतिवादींनी सदरचे शेड खोलून पाडण्याचा प्रयत्न करुन कब्जा करण्याचा प्रयत्न केला होता. प्रतिवादी हे संख्येने मोठे असल्याने वादींवर अन्याय करु पाहत आहेत.

६. या संदर्भात दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, कोपरगांव या न्यायालयात रे.मु.नं.१५८/२०१३ मध्ये झालेल्या हुकूमाविरुध्द् जिल्हा व सत्र न्यायालय व ना.उच्च न्यायालयात अपिल दाखल होवून त्यामध्ये वादींचे बाजून हुकूम झालेले आहेत. या कारणांस्तव, प्रतिवादींचे मनात वादींबद्दल द्वेष निर्माण होवून वादींचे दावा मिळकतींमधील कब्जे वहिवाटीस प्रतिवादी हे सातत्याने हरकती करीत आहेत. प्रतिवादी हे दावा मिळकतीत येवून वादींना दमदाटी, शिवीगाळ करतात तसेच अॅट्रॉसिटी कायदयाखाली गुन्हा दाखल करण्याची वारंवार धमकीही देतात. प्रस्तुतचा दावा दाखल करण्याच्या २ दिवस आधी अशाप्रकारे जोडजमाव करुन प्रतिवादींनी वादींना व त्यांचे कुटुंबियांना हरकती केल्या. जागेवर दावा मिळकतींच्या कब्जास व मेहनत मशागतीस हरकती केल्या. प्रतिवादी हे समजावून सांगुनही ऐकत नाहीत. त्यामुळे प्रतिवादींच्या चालू असलेल्या हरकतींना प्रतिबंध करणे अत्यंत गरजेचे झालेले आहे. अन्यथा प्रतिवादींच्या हरकती चालू राहिल्यास वादींच्या खरेदी मालकीच्या दावा मिळकतीच्या शांततामय कब्जास व उपभोगास अडचणी निर्माण होवून वादीचे कधीही न भरुन येणारे असे अपरिमित स्वरुपाचे नुकसान होणार आहे.

७. प्रतिवादींना वादींचे पुर्व हक्कदार नानासाहेब कापसे, भागीरथीबाई कापसे यांचे खरेदीखताची व मुदतखरेदीखताची त्याचप्रमाणे प्रस्तुत वादींचे खरेदीखताची व दावा

मिळकतीमधील कब्जे वहिवाटीची, नोंदींची माहिती होती व आहे मात्र त्याबाबत प्रतिवादींनी कधीही कोणतीही तक्रार अथवा वाद उपस्थित केलेला नाही. त्यांनी वस्तुस्थिती लपवुन ठेवून व जमीनीच्या वाढलेल्या किंमतीच्या लालसेपोटी संगनमत करुन, कट कारस्थान करुन, कापसे, सदाफळ व वादी यांचे संपूर्ण व्यवहार लपवून ठेवून खरेदीखताने वादींची दावा मिळकतीमध्ये मालकी कब्जे वहिवाट चालू असतानाही मा.उच्च न्यायालयात सेकंड अपील नं.२६१/२००० मध्ये आपआपसात खोटे वाटप दाखवून वादी व त्यांचे भावांचे अपरोक्ष तडतोड दाखल केली. त्याची माहिती वादींना झालेनंतर वादींनी मा.उच्च न्यायालयात रिव्हियू पिटीशन नं. ४/२०१२ दाखल केला. तसेच भागवत सारंगधर सदाफळ यांनीही रिव्हियू पिटीशन नं. ५/२०१२ दाखल केला. त्यामध्ये मा.उच्च न्यायालयाने प्रतिवादींनी वादींचे अपरोक्ष केलेली तडजोड रदद् केलेली असून पुर्वीचे सेकंड अपील पुर्ववत ठेवले.

८. अशारितीने प्रतिवादींना यश न आल्याने ते जागेवर दहशत तयार करुन वादीवर दडपण आणत आहेत. वादींच्या दावा मिळकतीमधील वहिवाटीस त्रास देवून जागेवर कब्जा करण्याचा, वादींना बेदखल करण्याच्या धमक्या संगनमताने करीत आहेत. मा.उच्च न्यायालयात प्रतिवादींनी तडतोड केल्याने त्यांनी दरम्यानच्या काळात वादींच्या नावाच्या नोंदी दावा मिळकतीवरुन कमी केल्या परंतु रिव्हियू अर्ज मंजूर झालेवर महसूल दप्तरी नोंदी पुर्ववत झालेल्या आहेत.

९. अशी सर्व परिस्थिती असतांना वादींनी दिनांक २५/०४/२०१३ रोजी पोलीस संरक्षण मिळणेकामी व प्रतिवादींवर प्रतिबंधात्मक कार्यवाहीसाठी तहसिलदार यांचेकडे अर्ज केला होता. तरीही प्रतिवादींच्या हरकती चालूच असतात. दावा मिळकतीमध्ये वादींनी बोअरवेल घेतलेला आहे. तथापि, प्रतिवादींच्या हरकतीमुळे वादींना दावा मिळकतीत पिके घेणेकामी अडचणी निर्माण होत आहेत. तशातच प्रतिवादींनी दावा मिळकतीमधील पेरुची झाडे उपटून टाकून वादींचे नुकसान केल्याने प्रतिवादींविरुध्द् गुन्हा दाखल होवून दोषारोपपत्र दाखल झाले आहे व त्यास एसटीसी क्रमांक १४१९/२०१५ पडलेला आहे. प्रतिवादींविरुध्द् त्यांचे हरकती, दमबाजी, शिवीगाळ, वादीची मोटारसायकलची तोडफोड याबाबत वादींनी वेळोवेळी राहाता पोलीस ठाणे, पोलीस अधीक्षक, अहमदनगर, जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडे तक्रारी दाखल केलेल्या आहेत. परंतु प्रतिवादींच्या हरकती थांबत नसल्याने प्रतिवादींविरुध्द् तुर्तातूर्त मनाई हुकूमाचा अर्ज दाखल करणे वादीस भाग पडले आहे.

*सबब, वादीस प्रथमदर्शनी केस असून, न्यायाचा समतोलही वादीचेच बाजूने आहे. अशा परिस्थितीत, दावा मिळकत १अ व १ब यामध्ये असणा-या वादींच्या कब्जे वहिवाटीस प्रतिवादींनी प्रस्तुत दाव्याचा निर्णय होईपावेतो हिल्ला हरकती करु नयेत असा तुर्तातूर्त मनाई हुकूम प्रतिवादींचे विरुध्द् देण्यात यावा अशी विनंती वादींनी उक्त अर्जान्वये केली आहे.*

*१०. प्रतिवादी क्रमांक १ ते ९ यांनी निशाणी क्रमांक २६ व प्रतिवादी क्रमांक १० ते १५ यांनी निशाणी क्रमांक २८ अन्वये त्यांचे म्हणणे सादर करुन प्रस्तुत अर्जातील वादींच्या कथनांचे खंडन केलेले आहे. त्यांनी विशेषतः असे कथन केले आहे की, दावा मिळकती या प्रतिवादी क्रमांक १ ते १५ यांच्या एकत्र कुटुंबदारीच्या असून अदयाप पावेतो दावा मिळकतींचे सरस निरस मानाने वाटप झालेले नाही. दावा मिळकतींचे वाटपाबाबत प्रथम प्रतिवादींची आजी मयत गजाबाई धोंडीबा पाळंदे हिने दिवाणी न्यायालय, कोपरगाव येथे रे.मु.नं. १९/१९८२ हा दावा दाखल केलेला होता. सदर दाव्याचा निकाल सन १९८९ मध्ये होवून दाव्याचा प्राथमिक हुकूमनामा झालेला आहे व वाटपाचे प्रक्रियेकरीता दरखास्त क्रमांक १८४/१९८९ ही अद्याप राहाता न्यायालयात प्रलंबित आहे. अशा परिस्थितीत अद्याप पावेतो प्रतिवादी अथवा प्रतिवादींचे पुर्व हक्कदार यांचे नांवे दावा मिळकती झालेल्या नाहीत. केवळ प्रतिवादी क्रमांक १० व त्यांचे आईचे नांवे कुटुंब व्यवस्थेकरीता दावा मिळकती होत्या. तथापि त्यांना दावा मिळकती विक्री करण्याचा कुठलाही हक्क व अधिकार नव्हता. तसेच दावा मिळकतींमध्ये त्यांचा एकटयाचा कब्जा कधीही नव्हता. दावा मिळकतींचा पुर्वीचा सर्व्हे नं. २३२/२ब असा होता.*

*११. सदरील दाव्याच्या अनुषंगाने प्रलंबित असलेल्या दरखास्तीमध्ये देखील प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्रमांक १ यांनी दिनांक ०२/०५/१९९२ रोजी टी.पी.ॲक्टचे कलम ५२ अन्वये नोटीस नोंदविली होती. त्याचप्रमाणे दिनांक १९/१०/१९९७ रोजी दैनिक लोकमत मध्ये दावा मिळकतींची कोणीही खरेदी विक्री करु नये अशी जाहिर नोटीस प्रसिध्द् केलेली होती. वादींचे पुर्व-हक्कदारांनी देखील प्रतिवादी व त्यांचे पुर्व-हक्कदारांच्या नोंदीबाबत तक्रारी केलेल्या होत्या. भागवत सारंगधर सदाफळ व कापसे हे सद्हेतुपूर्वक खरेदी करणारे नव्हते. अशा परिस्थितीत, प्रस्तुत प्रतिवादी क्रमांक १० यांनी सन १९९४ मध्ये दावा मिळकतींमध्ये त्यांचा हिस्सा निश्चित नसतांना व त्याच्या दिशाही ठरलेल्या नसतांना बेकायदेशीररित्या दावा मिळकतीपैकी ६९ आर क्षेत्राचा नानासाहेब कापसे व ११ आर क्षेत्राचा भागीरथीबाई*

*कापसे यांचेशी परस्पर व्यवहार केला. परंतु उपरोक्त खरेदी घेणार यांना दावा मिळकतीचा कब्जा कधीही मिळालेला नव्हता. त्यामुळे दावा मिळकतींचा कब्जा मिळणेकरीता त्यांनी कोपरगांव न्यायालयात रे.मु.नं.१३२/१९९७ हा दावा दाखल केलेला आहे जो अद्याप प्रलंबित आहे. परंतु उपरोक्त खरेदी घेणार यांचे नांवाच्या दावा मिळकतीच्या सात बारा उता-यावरील बेकायदेशीर नोंदीच्या आधारे त्यांनी वादींना दावा मिळकती कागदोपत्री बेकायदेशीर विक्री केलेल्या आहेत. त्याआधारे वादींनी देखील महसूल अधिका-यांना हाताशी धरुन त्यांचे नांवाच्या नोंदी दावा मिळकतीच्या सात बारा उता-यास करुन घेतल्या आहेत.*

*१२.* *यापुर्वी वादींचे पुर्व-हक्कदारांनी म्हणजेच कापसे यांनी शांताबाई तात्याबा पाळंदे व अरविंद तात्याबा यांचेविरुध्द् दावा मिळकतीस हरकती करुन नयेत म्हणुन रे.मु.नं. १३२/१९९७ हा दावा दाखल केलेला आहे. तसेच भागवत सारंगधर सदाफळ यांनी वादींचे पुर्व हक्कदार नानासाहेब कापसे यांचेविरुध्द् मोजणीचा व अतिक्रमित क्षेत्राचा कब्जा मिळणेसाठी दावा दाखल केला आहे. त्यामध्ये सुध्दा भागिरथीबाई कापसे यांनी दावा मिळकतीपैंकी ११ गुंठे क्षेत्राची मोजणी व अतिक्रमित क्षेत्राचा कब्जा मिळावा अशी मागणी केली आहे. भागिरथीबाई यांचा अर्ज या पुर्वी न्यायालयाने नामंजुर केला आहे. म्हणजेच वादींनी ज्यांच्याकडुन तथाकथित क्षेत्र खरेदी केले व ज्यासाठी मनाई हुकूमाची मागणी करीत आहेत ते क्षेत्रच वादींना खरेदीखताच्या वेळी मिळालेले नाही.*

*१३.* *मा. उच्च न्यायालयामधील सेकंड अपिल क्रमांक २६१/२००० मधील रिव्हियू पिटीशन नं. ४/२०१३ मध्ये दावा मिळकतीच्या ७/१२ उता-यासदरी दिनांक २२/१२/२०१० पुर्वीची परिस्थिती ठेवण्याचे आदेश असतांना देखील वादींनी गाव कामगार तलाठयास हाताशी धरुन व मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाचा चुकीचा अर्थ काढुन दावा मिळकतीच्या ७/१२ उता-यावर त्यांचे नावाच्या नोंदी केलेल्या आहेत. प्रत्यक्ष दावा मिळकत खरेदी घेणार नानासाहेब रामराव कापसे यांनी दावा मिळकत भागवत सारंगधर सदाफळ यांना गहाणखताने दिल्याचे दर्शविले व त्यांचेमार्फत दावा मिळकतींची रे.मु.नं. ५८५/२००५ अन्वये मोजणी करुन घेवुन बेकायदेशिररीत्या वादींच्या नसलेल्या कब्जाबाबत खोटा पुरावा गोळा करण्याचा प्रयत्न केला. सदर दाव्याचे कामकाज अद्याप प्रलंबित आहे.*

*१४.* *वादींना दिनांक १४/०१/२०१० व दिनांक ०२/०५/२०११ रोजीच्या खरेदीखतान्वये दावा मिळकतींचा कब्जा मिळालेला नाही. सदरची दोन्ही खरेदीखते ही*

बेकायदेशीर आहेत. त्यामुळे प्रस्तुतचे वादी हे विनाकारण प्रतिवादींविरुध्द खोटया स्वरुपाच्या फौजदारी तक्रारी करुन बेकायदेशीररित्या दावा मिळकतींचा कब्जा घेण्याच्या प्रयत्नात आहेत. दिनांक १५/१०/२०१० रोजी वादींना व त्यांचे पुर्व हक्कदार नानासाहेब कापसे यांना पोलिस निरीक्षक, राहाता यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १४९ अन्वये नोटिस देवुन प्रतिवादींच्या दावा मिळकतीमध्ये जाण्यास व कब्जे वहिवाटीस हिल्ला हरकती करण्याबाबत प्रतिबंधात्मक कारवाई केली होती. तसेच वादींनी दावा मिळकतीमध्ये असलेल्या प्रतिवादींच्या पत्रा शेडला त्यांच्या नावाच्या नोंदी नगरपंचायत दप्तरी करुन घेतल्या आहेत. त्यास प्रतिवादींनी हरकत घेवुन सदरची बाब मुख्याधिकारी, नगरपरिषद राहाता यांचे लक्षात आणुन दिली आहे. त्यानंतर मुख्याधिकारी राहाता यांनी दिनांक १८/०१/२०१४ रोजी दैनिक केसरी या वर्तमानपत्रात जाहिर नोटिस देवुन वादींना सदर पत्रा शेडच्या नोंदीच्या वापरास स्थगिती दिलेली आहे.

**१५.** दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी क्रमांक १ यांनी दिनांक १७/१२/२०१२ रोजी बोअरवेल घेतलेला असुन सदर बोअरवेलची नोंद होण्याकरीता कामगार तलाठी यांचेकडे अर्ज दिलेला आहे. वादी हे शेतकरी नसतांना दावा मिळकतीच्या खरेदीखतामध्ये शेतकरी असल्याचा पुरावा म्हणुन खोटा ७/१२ उतारा व प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. सदरची बाब तहसिलदार, राहाता यांनी टेनन्सी केस क्रमांक १४/२०१३ च्या निकालामध्ये नमुद केली आहे. त्याप्रमाणे फेरफार क्रमांक २६७८२ प्रमाणे दावा मिळकतीच्या उता-यास नोंद झाली आहे. वादींनी दावा मिळकत त्यांच्या कब्जात असल्याचा खोटा पुरावा तयार करण्याच्या प्रयत्नात गाव कामगार तलाठी यांना हाताशी धरुन सदर मिळकतीच्या ७/१२ उता-यास बनावट पुरवणी पान जोडले आहे. त्यामुळे वादींविरुध्द राहाता न्यायालयात आर.टी.सी.क्र. १९३/२०१४ ही केस भारतीय दंड विधान कलम ४२० व ४६३ अन्वये दाखल आहे.

**१६.** दरम्यानच्या काळात वादींनी महसुल अधिका-यांना हाताशी धरुन प्रतिवादींकडुन दावा मिळकतीचा बेकायदेशीर कब्जा घेण्यासाठी निरनिराळे अर्ज केले व त्यामध्ये तहसिलदार राहाता यांनी दिनांक २९/०४/२०१३ रोजी वादींना प्रतिवादींकडुन बेकायदेशीररीत्या दावा मिळकतींचा कब्जा देण्याकामी पोलिस मदतही दिली होती. या कारणास्तव प्रतिवादी क्रमांक ४ यांनी कोपरगाव न्यायालयात रे.मु.नं. १५८/२०१३ हा जाहिर ठरावाचा व मनाई हुकूमाचा दावा जिल्हाधिकारी, तहसिलदार, मंडलअधिकारी, पोलिस

निरीक्षक राहाता व प्रस्तुतच्या वादींविरुध्द दाखल केलेला असुन त्यामध्ये न्यायालयाने प्रतिवादींविरुध्द वादीचे कब्जे वहिवाटीस हिल्ला हरकती करण्यास व बेकायदेशीररित्या दावा मिळकतींचा कब्जा घेण्यास तुर्तातुर्त मनाई हुकूम दिला होता. सदर दाव्याचे कामकाज अद्याप प्रलंबित आहे.

१७. दावा मिळकती या प्रतिवादी यांच्या एकत्र हिंदु कुटुंबदारीच्या आहेत व त्यामध्ये न्यायालयाचे आदेशान्वये यापुर्वी वाटपाचा हुकूमनामा झालेला आहे. त्या अनुषंगाने दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ५४ अन्वये प्रक्रिया करणे अपेक्षित आहे. एखादया सह-हिस्सेदारास त्याचा मिळकतीमधील अविभक्त हिस्सा विक्री करावयाचा असल्यास खरेदीदारास कब्जासाठी स्वतंत्र कार्यवाही करणे आवश्यक आहे. हुकूमनाम्याप्रमाणे दरखास्तीचे कामी दावा मिळकतींची विक्री करु नये म्हणुन प्रतिवादी अरविंद पाळंदे यांनी अर्ज केलेला होता व त्याप्रमाणे मिळकतींची विक्री करु नये असा आदेश झालेला आहे. सदर हुकुमनाम्याप्रमाणे मिळकतींचे मालक व त्यांचे पुर्व हक्कदार यांचेवर होणारे निर्णय बंधनकारक आहेत. या सर्व गोष्टी पाहता वादींना दावा मिळकतीमध्ये कोणतेही कायदेशीर हक्क नाही. दिवाणी प्रकिया संहिता कलम ५४ प्रमाणे ज्या सह-हिस्सेदारांनी अविभक्त हिस्सा विक्री केलेला आहे त्याच्या हिश्श्यास येणा-या क्षेत्राचा कब्जा वादीस मागता येईल मात्र या क्षणी वादींना दावा मिळकतीचा कब्जा मागण्याचा किंवा त्या संदर्भात संरक्षण मागण्याचा अधिकार नाही.

१८. मा. उच्च न्यायालयात किंवा अन्य दाव्यांमध्ये रे.मु.नं.५८५/२००५ या दाव्यातील अतिक्रमित क्षेत्राच्या मागणीबाबत कोणताही संदर्भ देण्यात आलेला नव्हता. सदरची बाब लपवुन ठेवुन, दिशाभुल करुन वादी हे दावा मिळकतीमध्ये कब्जा असल्याचे कथन करत आहेत. वादींची दावा मिळकतीमध्ये प्रत्यक्ष कब्जे वहिवाट नाही. केवळ महसुल अधिका-यांना हाताशी धरुन त्यांच्या नावाची नोंद खोटया व बनावट कागदपत्रांच्या आधारे महसुल दप्तरी केलेली आहे म्हणून संबंधीतांवर कोर्ट केसेस चालू आहेत. प्रस्तुत दाव्यात वादींनी कब्जाची मागणी केलेली नाही व कोणताही जाहिर ठराव प्रतिवादींविरुध्द् मागितलेला नाही. वादींचे तथाकथित खरेदीखत हे मुलतः बेकायदेशीर असुन त्याव्दारे वादींना कुठलाही हक्क व अधिकार प्राप्त होत नाहीत. सबब, प्रस्तुतचा अर्ज खर्चासह रद्द करण्यात यावा अशी विनंती या प्रतिवादींनी केलेली आहे.

**१९.** वादी व प्रतिवादींचे विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. वादी व प्रतिवादी यांची कथने तसेच संचिकेत दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले असता खालील मुद्दे विचारार्थ उपस्थित होतात. त्यावरील विश्लेषणात्मक निष्कर्ष कारणमिमांसेसहीत खालीलप्रमाणे नोंदविले आहेत.

| मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|
| १. वादीचे पक्षामध्ये प्रथमदर्शनी केस आहे काय ? | नाही. |
| २. कोणाच्या बाजूने न्यायाचा समतोल आहे ? | प्रतिवादींचे बाजुने. |
| ३. उक्त अर्ज मंजूर केल्यास कोणास अपरिमित नुकसान होईल ? | प्रतिवादींना. |
| ४. अंतिम आदेश काय? | अर्ज नामंजूर. |

## कारणमिमांसा

### मुद्दे क्रमांक १ ते ३ करीता :

**२०.** उपरोक्त मुद्दे क्रमांक १ ते ३ हे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे त्यांचे विश्लेषण एकत्रितरित्या खालीलप्रमाणे:

**२१.** वादींनी त्यांचे पक्षामध्ये प्रथमदर्शनी केस आहे हे सिध्द् केले आहे काय हे पाहण्याकरीता वादीचे कथनांचा तसेच त्या पुष्टयर्थ सादर केलेल्या कागदोपत्री पुराव्यांचा व प्रतिवादींनी त्यास खंडनात्मक पुरावा सादर केला आहे काय याचे अवलोकन करणे जरुरीचे आहे. वादी व प्रतिवादी यांनी आपआपल्या कथनांपुष्टयर्थ सादर केलेल्या आवश्यक तेवढयाच कागदोपत्री पुराव्यांचा उल्लेख पुढे विश्लेषणादरम्यान योग्य त्या ठिकाणी करण्यात आलेला आहे.

**२२.** वादींचे कथनांप्रमाणे त्यांनी दावा मिळकत १ अ व १ब या नानासाहेब कापसे व भागीरथीबाई कापसे यांचेकडून नोंदणीकृत दस्तान्वये अनुक्रमे दिनांक १४/०१/२०१० व दिनांक ०२/०५/२०११ रोजी खरेदी घेतलेल्या आहेत. तेव्हापासून त्यांची दावा मिळकतीमध्ये मालकी हक्काने कब्जे वहिवाट चालू आहे. या कथनांपुष्टयर्थ वादींनी निशाणी क्रमांक २३ सोबत दावा मिळकत १अ व १ब यांच्या खरेदीखतांच्या प्रती सादर केल्या आहेत. त्यापैंकी दावा मिळकत १अ च्या खरेदीखताची प्रत पाहता असे दिसून येते की, वादींनी सदरची मिळकत

नानासाहेब रामराव कापसे यांचेकडून दिनांक १४/०१/२०१० रोजी रुपये १६,००,०००/- इतक्या किंमतीस नोंदणीकृत दस्ताने खरेदी केलेली आहे. तसेच दावा मिळकत १ब च्या खरेदीखताची प्रत पाहता असे दिसून येते की, वादी क्रमांक २अ चे पती मुन्वर कालुभाई शेख यांनी सदरची मिळकत भागीरथीबाई नानासाहेब कापसे यांचेकडून दिनांक ०२/०५/२०११ रोजी रुपये ५,६१,०००/- इतक्या किंमतीस नोंदणीकृत दस्ताने खरेदी केलेली आहे. सदर दोन्ही खरेदीखतामध्ये संबंधीत क्षेत्राच्या चतु:सिमा नमुद करुन सदर क्षेत्राचा कब्जा खरेदी घेणार म्हणजेच वादींना दिला असल्याचेही नमूद केलेले आहे. सदर खरेदीखतांप्रमाणे वादींचे नावाच्या नोंदी निशाणी क्रमांक ३ सोबत सादर केलेल्या फेरफार क्रमांक २२८२६ व २३७५९ अन्वये दावा मिळकतीस झाल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे दावा मिळकत गट क्रमांक २३२/९ च्या सात बारा उता-यास देखील वादींच्या नांवाच्या नोंदी संबंधीत क्षेत्रास भोगवटदार सदरी झाल्याचे दिसून येते.

**२३.** निशाणी क्रमांक २३ सोबतच्या दाखल कागदपत्रांवरुन असेही दिसून येते की, वादींनी दावा मिळकत १अ ही खरेदी करण्यापुर्वी सदरची मिळकत नानासाहेब रामराव कापसे यांनी या दाव्यातील प्रतिवादी क्रमांक १० बबन तात्याबा पाळंदे व त्यांची आई श्रीमती अनुसयाबाई तात्याबा पाळंदे यांचेकडून दिनांक २२/११/१९९४ रोजी नोंदणीकृत दस्ताने खरेदी घेतली होती. तद्नंतर दिनांक १०/१०/२००५ रोजी नानासाहेब कापसे यांनी दावा मिळकत १अ ही भागवत सारंगधर सदाफळ यांना सहा वर्षांच्या मुदतीकरीता गहाणस्वरुपी दिली. त्यानंतर सदरची मिळकत नानासाहेब कापसे यांनी भागवत सदाफळ यांचेकडून गहाणमुक्त करुन घेतली व तसा गहाणमुक्तीचा दस्त दिनांक १४/०१/२०१० रोजी भागवत सदाफळ यांनी नानासाहेब कापसे यांचे लाभात नोंदवुन दिला व त्याच दिवशी सदर मिळकत वादींनी नानासाहेब कापसे यांचेकडून खरेदी घेतली. अशाप्रकारे वादींचे कथनांप्रमाणे दावा मिळकती या उपरोक्त कागदोपत्रांच्या आधारे मालकी हक्काने त्यांचे कब्जामध्ये आहेत.

**२४.** याचसंदर्भात प्रतिवादींचे कथनांप्रमाणे दावा मिळकती या प्रतिवादी यांच्या एकत्र हिंदु कुटुंबदारीच्या आहेत व त्यासंदर्भात न्यायालयाचे आदेशान्वये यापुर्वी वाटपाचा हुकूमनामा झालेला आहे. त्या अनुषंगाने दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ५४ अन्वये प्रक्रिया करणे अपेक्षित आहे. या कथनांचे अनुषंगाने प्रतिवादी क्रमांक १ ते ९ यांनी निशाणी क्रमांक ३८ सोबत दाखल केलेल्या रे.मु.नं. २१/१९८२ या दाव्यातील हुकूमनाम्याची प्रत पाहता असे

दिसून येते की, प्रतिवादींचे पुर्व-हक्कदार गजाबाई धोंडीबा पाळंदे यांनी त्यांचे एकत्र हिंदु कुटुंबाच्या मिळकतींच्या वाटपाकरीता दावा दाखल केला होता. सदर दाव्याचा निर्णय दिनांक २८/०२/१९८९ होवून त्यामधील वादी गजाबाई पाळंदे यांचा मिळकतींमध्ये २/३ इतका हिस्सा ठरविण्यात आला. महत्वाची बाब म्हणजे त्या दाव्यामध्ये प्रस्तुत दाव्यातील मिळकतीचा देखील समावेश असल्याचे दिसून येते. रे.मु.नं. २१/१९८२ या दाव्यातील हुकूमनाम्यावरुन नियमित दरखास्त क्रमांक १८४/१९८९ कोपरगांव न्यायालयात दाखल झाली. सदर दरखास्तीप्रमाणे दिनांक १७/०६/२००३ रोजी तालुका निरिक्षक भुमि अभिलेख यांचे कार्यालयाकडून यातील प्रतिवादी व त्यांचे पुर्व हक्कदार यांना मिळकतींचे वाटपाबाबत नोटीस देण्यात आलेली आहे. सदर दरखास्त पुढे राहाता न्यायालयात वर्ग झाल्याचे व सदर दरखास्तीस या न्यायालयात नवीन क्रमांक ५८९/२००५ असा पडल्याचे दिसून येते.

**२५.** उपरोक्त दोन्ही पक्षकारांनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, प्रतिवादींचे पुर्वहक्कदार गजाबाई धोंडीबा पाळंदे यांनी या दाव्यातील मिळकतींसह इतर मिळकतींचे वाटपाकरीता दाखल केलेल्या दाव्याचा निर्णय दिनांक २८/०२/१९८९ रोजी झालेला आहे व सदर निर्णयाच्या अंमलबजावणीकरीता या न्यायालयात नियमित दरखास्त क्रमांक ५८९/२००५ हे प्रकरण दाखल झाले आहे. त्याप्रमाणे दावा मिळकतींसह इतर मिळकतींचे प्रतिवादी व त्यांचे पुर्वहक्कदारांमध्ये अद्याप सरस निरस मानाने वाटप झालेले नाही किंवा वाटप झाल्याचे वादीने दर्शवुनही दिलेले नाही. अशा परिस्थितीत दावा मिळकतींचे सरस निरस वाटप झाले नसताना दावा मिळकत १अ ही प्रथम दिनांक २२/११/१९९४ रोजी या दाव्यातील प्रतिवादी क्रमांक १० व त्यांची आई अनुसयाबाई यांचेकडून नानासाहेब कापसे यांना विक्री झाल्याचे दिसून येते.

**२६.** वास्तविक सदर मिळकतीचे विक्रीच्यावेळी सरस निरस मानाने वाटप झाले नसतानाही दिनांक २२/११/१९९४ रोजीच्या खरेदीखतामध्ये त्या मिळकतीच्या चतु:सिमा नमुद करुन नानासाहेब कापसे यांना मिळकतीचा कब्जा दिल्याचे नमूद केले आहे जे प्रस्थापित न्यायतत्वाच्या विरुध्द् आहे. मालमत्ता हस्तांतरण अधिनियम (Transfer of Property Act) चे कलम ४४ प्रमाणे मिळकतीचा सह-हिस्सेदार त्याचा अविभक्त हिस्सा विक्री करु शकतो तथापी तो हिस्सा खरेदी करणा-याने मिळकतीचा कब्जा व मिळकतीचे वाटपाकरीता इतर सह-हिस्सेदारांविरुध्द दावा दाखल करणे आवश्यक आहे.

२७. प्रतिवादींनी याबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाच्या **रामदास वि. सिताबाई व इतर, २००९(६) एमएच.एल.जे.८८६** या न्यायनिर्णयाचा आधार घेतला आहे. ज्यामध्ये परिच्छेद १७ मध्ये असे न्यायतत्व प्रस्थापित केले आहे की, **''सह-हिस्सेदाराचा अविभक्त हिस्सा विक्री अथवा हस्तांतर होवू शकतो परंतु जो पर्यंत सदर मिळकत ही न्यायालयाच्या हुकूमनाम्याद्वारे अथवा सह-हिस्सेदारांच्या समझोत्याने सरस निरस मानाने वाटप होत नाही तोपर्यंत अविभक्त हिस्सा खरेदी करणा-या खरेदीदारास कबजा देता येणार नाही.''**

२८. सबब, या न्यायतत्वाप्रमाणे एका मिळकतीमध्ये अनेक सह-हिस्सेदार असतील व त्यांचेमध्ये सरस निरस मानाने वाटप झाले नसेल तर निश्चितच मिळकतीचा कोणता हिस्सा कोणास जाईल हे सांगता येणार नाही. त्यामुळे जर मिळकतीचे सरस निरस मानाने वाटपच झाले नसेल तर प्रत्येक हिस्सेदाराचा मालकी हक्क व कब्जा मिळकतीच्या नक्की कोणत्या भागावर आहे हे निश्चित होत नाही.

२९. प्रस्तुत दाव्यातील वादींचे पुर्वहक्कदार नानासाहेब कापसे व भागीरथीबाई कापसे यांनी प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्रमांक १० बबन पाळंदे व त्यांची आई अनुसयाबाई पाळंदे यांचा एकत्र हिंदू कुटुंबाच्या मिळकतींमधील अविभक्त हिस्सा खरेदी घेतलेला होता व सदरचा हिस्सा पुढे वादींनी कापसे यांचेकडून खरेदी घेतलेला आहे. वस्तुस्थितीप्रमाणे प्रतिवादींमध्ये अदयाप मिळकतींचे सरस निरस मानाने वाटपच झाले नसल्यामुळे वादींचे पुर्वहक्कदार नानासाहेब कापसे व भागीरथीबाई कापसे यांचा व त्यानंतर वादींचा सदर मिळकतींमध्ये नक्की कोणत्या भागावर कबजा आहे हे निश्चित नाही. जरी संबंधीत खरेदीखतांमध्ये मिळकतींच्या चतु:सिमा नमुद केल्या असल्या तरी अद्याप मिळकतींचे सरस निरस मानाने वाटप होऊन सीमा निश्चित झाल्या नसल्याने सदर खरेदीखतामध्ये नमूद केलेल्या चतु:सिमा या मा.सर्वोच्च न्यायालयाच्या उपरोक्त नमूद रामदास वि. सिताबाई व इतर या न्यायनिर्णयामधील न्यायतत्वाच्या विरुध्द् दर्शविल्या आहेत असे प्रथमदर्शनी सिध्द् होते.

३०. जरी प्रतिवादी क्रमांक १० व त्यांची आई अनुसयाबाई यांनी कापसे यांना व कापसे यांनी वादींना दावा मिळकतींचे नोंदणीकृत खरेदीखत करुन देताना दावा मिळकत खरेदी घेणार यांचे कब्जामध्ये दिली असे नमूद केली असली तरी सदरचा कब्जा उपरोक्त

न्यायतत्वाप्रमाणे कायदेशीर समजता येणार नाही. तसेच दावा मिळकतींच्या महसूल दप्तरी वादींच्या नांवाची नोंद झाली असली तरी सदरची नोंद ही उक्त खरेदीखताचे आधारेच करण्यात आलेली आहे. परंतु सदर मिळकतींमध्ये वादींचा कब्जा हा वादातीत असल्यामुळे महसूल दप्तरी दावा मिळकतींना वादींच्या नांवाची नोंद कब्जाकरीता ग्राहय धरता येणार नाही.

**३१.** वास्तविक, वादींचे पुर्वहक्कदार कापसे यांनी किंवा प्रस्तुतचे वादी यांनी मिळकतीचा कब्जा व मिळकतीचे वाटपाकरीता इतर सह-हिस्सेदारांविरुध्द दावा दाखल करणे आवश्यक होते परंतु तसे न करता वादी यांनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादींविरुध्द् केवळ निरंतर मनाई हुकूम मिळणेकरीता दाखल केलेला आहे. त्यामुळे प्रस्तुत दाव्यास व त्याअनुषंगाने उक्त निशाणी क्रमांक ५ च्या अर्जास विनिर्दिष्ट अनुतोष अधिनियम (Specific Relief Act) चे कलम ४१ (एच) या तरतूदीचा बाध येतो. कारण सदर तरतूदीप्रमाणे वादीस मिळकतींच्या वाटपाची मागणी करुन प्रभावकारी अनुतोष मिळविता येवू शकत असतानाही त्यांनी तो मागणी केलेला नाही.

**३२.** दुसरी एक बाब म्हणजे मिळकतींच्या वाटपाकरीता प्रतिवादींमध्ये दाखल असलेल्या नियमित दरखास्त क्रमांक ५८९/२००५ यामध्ये देखील वादींचे पुर्व-हक्कदार कापसे व त्यानंतर प्रस्तुत वादींनी हजर होवून मिळकतींमधील त्यांनी खरेदी घेतलेल्या अविभक्त हिश्श्याबाबत व त्याअनुषंगाने सह-हिस्सेदाराचा हिस्सा त्यांना मिळावा अशी मागणी केलेली नाही, जेणे करुन हुकूमनामा अंमलबजावणी करणा-या न्यायालयास दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ४७ प्रमाणे त्यासंदर्भातील सर्व प्रश्न निर्धारित करता आले असते. परंतु वादी हे सदर दरखास्तमध्ये हजर झाल्याबाबतचा कोणताही पुरावा त्यांनी सादर केलेला नाही.

**३३.** त्याचप्रमाणे सदर दरखास्तीमध्ये या दाव्यातील प्रतिवादी क्रमांक १ अरविंद तात्याबा पाळंदे यांनी दिनांक ०१/०७/२००५ रोजी मनाई हुकूम मिळण्याचा अर्ज दाखल केला होता. सदर अर्जावर न्यायालयाने दिनांक २५/०८/२०१० रोजी आदेश पारित करुन त्यातील ऋणको क्रमांक १ अनुसयाबाई व ऋणको क्रमांक २ बबन पाळंदे (या दाव्यातील प्रतिवादी क्रमांक १०) यांनी दावा मिळकतींपैकी कोणताही भाग दरखास्त प्रकरणाचा अंतिम निकाल होईपावेतो हस्तांतरित करु नये असा मनाई हुकूम दिलेला आहे. तथापि, वादींनी दावा मिळकत १ब ही दिनांक ०२/०५/२०११ रोजी म्हणजेच न्यायालयाचा उपरोक्त मनाई हुकूम

अस्तित्वात असताना खरेदी घेतलेली आहे. सदरची मिळकत खरेदी करतेवेळी न्यायालयाचा सदरचा हुकूम अस्तित्वात होता हे वादींना माहिती नव्हते असेही वादींनी कथन केलेले नाही किंवा तसा प्रथमदर्शनी पुरावा सादर केलेला नाही. अशा परिस्थितीत न्यायालयाचा मनाई हुकूम अस्तित्वात असतांना वादींनी दावा मिळकत १ब चे करुन घेतलेले खरेदीखत कायदेशीर आहे असे म्हणता येणार नाही.

३४. वादींनी निशाणी क्रमांक ३२ सोबत सादर केलेल्या कागदपत्रांच्या प्रतीवरुन असे दिसून येते की, दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, कोपरगाव येथील रे.मु.नं. १५८/२०१३ यामधील निशाणी क्रमांक ६ व ३४ वरील दिनांक १०/१०/२०१३ रोजीच्या आदेशाप्रमाणे त्यातील वादी आण्णासाहेब पाळंदे (या दाव्यातील प्रतिवादी क्रमांक ४) व त्यातील प्रतिवादी क्रमांक ५ (या दाव्यातील वादी क्रमांक १) यांना दावा मिळकतीमध्ये सामाईक वहिवाट करण्याचा हक्क असल्याचे व त्यांनी एकमेकांच्या सामाईक कब्जास हरकत अडथळा करु नये असा तुर्तातूर्त मनाई हुकूम देण्यात आला होता. तथापि, सदरचा आदेश किरकोळ दिवाणी अपील क्रमांक ६६/२०१३ मध्ये रद्द होवून त्या दाव्यातील प्रतिवादी क्रमांक ५ म्हणजेच या दाव्यातील वादींचा दावा मिळकतीमध्ये कब्जा असल्याचे मा. जिल्हा न्यायाधीश-१, कोपरगाव यांनी दिनांक २७/०३/२०१४ रोजीच्या आदेशान्वये ग्राहय धरले. सदर न्यायनिर्णयास यातील प्रतिवादी क्रमांक ४ आण्णासाहेब पाळंदे यांनी मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्रमांक ८३९/२०१५ अन्वये आव्हान दिले. मा.उच्च न्यायालयाने सदरची याचिका दिनांक १४/०७/२०१५ रोजीच्या आदेशान्वये फेटाळली.

३५. उपरोक्त नमूद सर्व निर्णय पाहता ते अंतरिम अर्जावर ज्या त्या परिस्थितीमध्ये दिल्याचे दिसून येतात. अद्याप रे.मु.नं.१५८/२०१३ हा दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, कोपरगांव या न्यायालयात प्रलंबित असून त्यामध्ये अंतिम निर्णय झालेला नाही. त्यामुळे दावा मिळकतींचे प्रतिवादी व त्यांचे पुर्वहक्कदार यांचेमध्ये सरस निरस मानाने वाटप न झालेल्या वस्तुस्थितीला व मा.सर्वोच्च न्यायालयाच्या उपरोक्त नमूद रामदास वि. सिताबाई व इतर या न्यायानिर्णयामधील न्यायतत्वास बगल देवून वादींना दावा मिळकतीवर त्यांचा कब्जा आहे असे स्थापित करता येणार नाही.

**३६.** वादींनी निशाणी क्रमांक ३२ सोबत मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सेकंड अपील क्रमांक २६१/२००० यामध्ये सादर केलेल्या रिव्हियु अर्ज क्रमांक ४/२०१३ ची प्रत सादर केली आहे. सदर प्रतिचे अवलोकन करता या दाव्यातील प्रतिवादींनी वादींच्या अपरोक्ष सदर अपिलामध्ये तडजोड केली. त्यामुळे वादींनी सदर रिव्हियु अर्जाव्दारे प्रतिवादींमध्ये मा. उच्च न्यायालयात दिनांक २२/१२/२०१० रोजी झालेली तडजोड रद्द व्हावी अशी मागणी केली. त्याप्रमाणे मा. उच्च न्यायालयाने दिनांक ०१/०४/२०१३ रोजीच्या रिव्हियु अर्ज क्रमांक ०४/२०१३ व ०५/२०१३ मधील आदेशान्वये सेकंड अपील क्रमांक २६१/२०१० मध्ये दिनांक २२/१२/२०१० रोजी झालेला आदेश रद्द केला व सेकंड अपील क्रमांक २६१/२०१० ची स्थिती पुर्ववत केली. सदरचा आदेश पारित करतांना मा. उच्च न्यायालयाने वादींच्या खरेदीखताच्या स्वरुपाबाबत कोणताही आदेश पारित केला नाही असे स्पष्टपणे नमुद केले आहे. अशा प्रकारे मा. उच्च न्यायालयाने वादींच्या खरेदीखताच्या स्वरुपाबाबत कोणताही आदेश पारित केला नसुन अद्याप सदर सेकंड अपिल प्रलंबित आहे.

**३७.** सबब, उपरोक्त विश्लेषणावरुन असा निष्कर्ष निघतो की, वादींनी खरेदी केलेल्या दावा मिळकतीचे प्रतिवादींमध्ये अद्याप सरस निरस मानाने वाटप झालेले नाही. त्यांनी प्रतिवादींपैकी सह-हिस्सेदाराचा अविभक्त हिस्सा खरेदी घेतला आहे. त्यामुळे वादींचा मिळकतीवर नेमका कोणत्या क्षेत्रावर कब्जा आहे हे निश्चित नाही. तसेच त्यांनी दावा मिळकतींचे वाटपाकरीता दावा दाखल केला नाही किंवा सदर मिळकती संदर्भात दाखल झालेल्या दरखास्त प्रकरणामध्ये हजर होवुन त्यांचा हिस्सा ठरवुन मिळावा अशी मागणी केली नाही. अशा परिस्थितीत वादी हे दावा मिळकती संदर्भात त्यांच्या हक्कामध्ये मनाई हुकूम मिळण्यास पात्र नाहीत.

**३८.** वादींनी मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील श्रीमती पी. एन. वनकुद्रे विरुध्द सी. एस. वनकुद्रे आणि इतर, एआयआर २००२ बॉम्बे १२९ या न्यायनिर्णयाचा आधार घेतला आहे. सदर न्यायनिर्णयामध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी *" Informal family arrangement arrived at whereby various members of family were put in possession and enjoyment of different property – All members of family were signatories to said arrangement – Partition*

*so arrived at was acted upon by parties and they also derived benefits therefrom – No objections raised about it for number of years – In such circumstances even assuming that documents were required to be registered, conduct of members would operate estoppal preventing them from resiling from said arrangements – One member cannot seek injunction or restraint order in respect of property partitioned and mutated in favour of another member. "*
असे न्यायतत्व प्रस्थापित केले आहे. तथापी, प्रस्तुत प्रकरणात अद्याप मिळकतींचे सरस निरस मानाने वाटपच झाले नसल्याने व त्या संदर्भात दरखास्त प्रकरण दाखल असल्याने सदरचे न्यायतत्व या प्रकरणास लागु पडत नाही.

३९. परिणामतः वादींचे पक्षामध्ये प्रथमदर्शनी केस असल्याचे सिध्द् होत नाही. तसेच या बाबतीत न्यायाचा समतोल देखील वादींचे बाजूने दिसुन येत नाही. दावा मिळकतींमध्ये अद्याप वादींचा हिस्सा कोणत्या भागावर आहे हे ठरले नसल्यामुळे वादींच्या पक्षामध्ये तुर्तातुर्त मनाई हुकूम न दिल्यास त्यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब मुद्दे क्रमांक १ ते ३ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविण्यात येत आहे व मुद्दा क्रमांक ४ चे निष्कर्षादाखल खालील आदेश पारित करण्यात येत आहेत.

## आदेश

१. वादीचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात आला आहे.

२. उक्त अर्जाचा खर्च अंतिम निकालानंतर होणा-या खर्चाच्या आकारणीवेळी विचारात घ्यावा.

राहाता.
दिनांक : १३/०४/२०१६.

( वि. वि. खुळपे )
२ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
राहाता.